**निशाणी ८०**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. २ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – भारत भाऊ देशमाने, वय – ६४ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – गोपाळवाडी कोतुळ,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक ०२.०३.२०१३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. पोलीसांनी गावामध्ये माझ्या सह्या घेतल्या होत्या. आता मला अभिलेखावरी घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर अनुक्रमांक १ वरती माझी सही असून त्यातील मजकुराबाबत मला माहीती नाही. सहीस **निशाणी ८१** देण्यात येते.

***(साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन देत नसल्याने साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी अभियोग पक्षाने मागितली. परवानगी देण्यात आली.)***

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२.०३.२०१३ रोजी पोलीसांनी मला गोपाळवाडी कोतुळ येथील सर्व्हे नंबर ८८, ८९ च्या हिस्सा क्रमांक ५.५५ आर या क्षेत्रामध्ये बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर गिन्नी गवत व पाण्याचा बोअर होता. हे म्हणणे खरे नाही की, संजय देशमुख यांनी घटनास्थळ दाखवले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्या ठिकाणी दिसत्या परिस्थितीनुसार पंचनामा केला, तो मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की,

**निशाणी ८०**

आरोपी हे माझ्या ओळखीचे आहेत. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, फिर्यादी सुध्दा माझ्या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला वाचवण्याकरीता मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एच. गोंगे यांच्या मार्फत –**

३. उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE

Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2025.09.25 15:00:29 +0530

दिनांक २५.०९.२०२५
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले